Test Booklet Code & No.
प्रश्नपत्रिका कोड व क्र.

**A**

# Paper-III

# JOURNALISM AND MASS COMMUNICATION

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

(Name) ................................................

2. (Signature) ........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## MAY - 19316

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 75 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Journalism and Mass Communication
## Paper III
# पत्रकारिता आणि जनसंचार
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

---

1. What does 'Montage' mean in TV parlance ?

   (A) Mounting of camera on a stand

   (B) Background music

   (C) Juxtaposition or partial superimposition of several shots to form a single image

   (D) Superimposition of text on images to match the audio

2. Developing feelings of kinship with media characters is known as a .................. relationship.

   (A) Social

   (B) Parasocial

   (C) Cathartic

   (D) Antisocial

1. दूरचित्रवाणीच्या परिभाषेत 'मोंताज' म्हणजे काय ?

   (A) स्टँडवर कॅमेरा माउंट करणे

   (B) पार्श्वसंगीत

   (C) विविध दृश्य एकमेकांशी जुळवून किंवा अंशतः सुपरइंपोज करून एक प्रतिमा बनवणे

   (D) ध्वनीनुसार दृश्यांवर लिखित मजकूर सुपरइंपोज करणे

2. माध्यमांमधून दाखवल्या जाणाऱ्या व्यक्तिरेखांविषयी निर्माण होणाऱ्या सख्यभावाला कोणत्या प्रकारचे नाते म्हटले जाते ?

   (A) सामाजिक

   (B) अर्धसामाजिक (पॅरासोशल)

   (C) विरेचक (कॅथार्टिक)

   (D) समाजविघातक

3. A basic premise of the public journalism movement is that journalism which has a purpose that it ought to try and improve the quality of civic life by fostering participation and debate. Michael Schudson described this as a ................. .
   (A) Market model
   (B) Trustee model
   (C) Advocacy model
   (D) Democratic model

4. What is 'protocol' in communication technology ?
   (A) Rules two computers must follow to exchange formats across the internet
   (B) Rules two computers must follow to share the information in offline mode
   (C) User interface with computer
   (D) Rules the programmers follow while designing the software

3. सार्वजनिक पत्रकारिता चळवळीच्या मूलभूत तत्त्वानुसार पत्रकारितेचे उद्दिष्ट नागरी जीवन सुधारण्याचा प्रयत्न करण्यासाठी सहभाग आणि चर्चा यांना प्रोत्साहन देणे हे आहे. मायकेल शुड्सन यांनी त्याचे वर्णन कोणत्या संज्ञेने केले आहे ?
   (A) बाजारपेठ प्रतिमान (मार्केट मॉडेल)
   (B) विश्वस्त प्रतिमान (ट्रस्टी मॉडेल)
   (C) ॲडव्होकसी प्रतिमान
   (D) लोकशाही प्रतिमान

4. संज्ञापन तंत्रज्ञानात 'प्रोटोकॉल' म्हणजे काय ?
   (A) इंटरनेटवरून 'फॉर्मट्स'ची देवाणघेवाण करण्यासाठी दोन संगणकांनी पाळण्याचे नियम
   (B) 'ऑफलाइन' असताना दोन संगणकांनी माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी पाळण्याचे नियम
   (C) संगणक वापरण्यासाठी वापरकर्त्याला आवश्यक साधन (इंटरफेस)
   (D) सॉफ्टवेअर तयार करताना अभियंते अंमलात आणत असलेले नियम

5. In the context of music industry which of the following is the registered copyright society by the central government under the Copyright Act, 1957 ?

(A) Indian Music Industries Association (IMI)

(B) Indian Copyright Protection Federation (ICPF)

(C) Indian Performing Rights Society Limited (IPRS)

(D) Indian Music Rights Protection Association (IMRPA)

6. The first significant political protest play in India was Neel Darpan. It was written by :

(A) Sharat Chandra

(B) Chittaranjan Pal

(C) Dinabandhu Mitra

(D) Raja Rammohan Roy

5. भारतीय संगीत उद्योगाच्या संदर्भात खालीलपैकी कोणती संस्था केंद्र सरकारने 1957 च्या मुद्रणाधिकार कायद्याअंतर्गत नोंदणीकृत मुद्रणाधिकार संस्था म्हणून स्थापन केली आहे ?

(A) इंडियन म्युझिक इंडस्ट्रीज असोसिएशन (आय.एम.आय.)

(B) इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन फेडरेशन (आय.सी.पी.एफ.)

(C) इंडियन परफॉर्मिंग राईटस् सोसायटी लिमिटेड (आय.पी.आर.एस.)

(D) इंडियन म्युझिक राईटस् प्रोटेक्शन असोसिएशन (आय.एम.आर.पी.ए.)

6. भारतातील पहिले निषेध व्यक्त करणारे नाटक 'नीलदर्पण' हे होते. त्याचे लेखक कोण होते ?

(A) शरत्चंद्र

(B) चित्तरंजन पाल

(C) दीनबंधू मित्र

(D) राजा राममोहन रॉय

7. Which of the following *cannot* be considered as the typical characteristic of 'mass audiences' in mass communication ?

   (*i*) heavy feedback

   (*ii*) large number

   (*iii*) wide geographic spread

   (*iv*) identical reception of message

   Select the correct answer

   (A) (*i*)

   (B) (*ii*)

   (C) (*iii*)

   (D) (*iv*)

8. TRAI represents :

   (A) Telecom Rules And Instructions

   (B) Telecommunication Regulatory Authority of India

   (C) Trial Role And Index

   (D) Telephone Rural Authority India

7. जनसंज्ञापनातील 'जन' किंवा 'ग्राहक' या संकल्पनेची खालीलपैकी कोणती बाब वैशिष्ट्य म्हणता येणार **नाही** ?

   (*i*) मोठा प्रतिसाद

   (*ii*) मोठी संख्या

   (*iii*) मोठी भौगोलिक व्याप्ती

   (*iv*) एकसमान संदेशाचे ग्रहण

   योग्य उत्तर निवडा :

   (A) (*i*)

   (B) (*ii*)

   (C) (*iii*)

   (D) (*iv*)

8. TRAI हे कशाचे लघुरूप आहे ?

   (A) टेलिकॉम रूल्स अँड इन्स्ट्रक्शन्स

   (B) टेलिकम्युनिकेशन रेग्युलेटरी ॲथॉरिटी ऑफ इंडिया

   (C) ट्रायल रोल अँड इंडेक्स

   (D) टेलिफोन रूरल अथॉरिटी इंडिया

9. 'Siri' is a personalised service that is available on :

(A) iphone

(B) Tablet PC

(C) ipod

(D) Blackberry

10. Dependency theory focuses on bringing about change in :

(A) Structural factors

(B) Individual behaviour

(C) Social conditions

(D) Communication infrastructure

9. 'सिरी' ही व्यक्तिगत सेवा कशावर उपलब्ध आहे ?

(A) आयफोन

(B) टॅब्लेट पीसी

(C) आय्पॉड

(D) ब्लॅकबेरी

10. अवलंबित्व सिद्धान्त कोणत्या प्रकारच्या बदलावर केंद्रित आहे ?

(A) संरचनात्मक घटकांतील

(B) व्यक्तिगत वर्तनातील

(C) सामाजिक स्थितीतील

(D) संज्ञापन सोयीसुविधांतील

11. A qualitative way of measuring audience reactions in which small group of people are questioned by skilled moderator is called as :

(A) Survey

(B) Participant observation

(C) Personal interview

(D) Focus group

12. When is summative research conducted ?

(A) After creation of communication

(B) After transmission of communication

(C) After consumption of communication

(D) Before conception of communication

13. Which of the following is *not* a type of graphical representation ?

(A) Pie

(B) Histogram

(C) Hologram

(D) Graph

11. माध्यम-ग्राहकांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी कुशल सूत्रसंचालकाच्या मदतीने छोट्या गटात चर्चा घडवून आणण्याच्या गुणात्मक पद्धतीला काय म्हणतात ?

(A) सर्वेक्षण

(B) सहभागी निरीक्षण

(C) व्यक्तिगत मुलाखत

(D) विषयकेंद्री चर्चा (फोकस ग्रुप)

12. 'निष्कर्षात्मक संशोधन' (समेटिव्ह रिसर्च) कधी केले जाते ?

(A) संज्ञापनाची निर्मिती झाल्यानंतर

(B) संज्ञापनाचे प्रसारण झाल्यानंतर

(C) संज्ञापनाचे ग्रहण/उपभोग झाल्यानंतर

(D) संज्ञापनाची कल्पना सुचण्यापूर्वी

13. पुढीलपैकी कोणते चित्ररूप सादरीकरण नसते ?

(A) पाई

(B) हिस्टोग्राम

(C) होलोग्राम

(D) ग्राफ

14. Which of the following terms is *not* used with reference to audiences ?
    - (A) geographical
    - (B) target
    - (C) intended
    - (D) visible

15. By whom were propaganda techniques first codified and applied in a scientific manner ?
    - (A) Noam Chomsky and Walter Lippman
    - (B) Ben Bogdikian and Edward Berneys
    - (C) Walter Lippman and Edward Berneys
    - (D) Bob Woodward and Noam Chomsky

14. पुढीलपैकी कोणती संज्ञा माध्यम-ग्राहकांच्या (ऑडियन्स) संदर्भात वापरली जात **नाही** ?
    - (A) भौगोलिक (जिओग्राफिकल)
    - (B) लक्ष्य (टार्गेट)
    - (C) ईप्सित (इंटेंडेड)
    - (D) दृष्टिगोचर (visible)

15. पद्धतशीर प्रचार (प्रॉपेगांडा) तंत्राची शास्त्रीय-पद्धतीने नोंद करून त्याचे उपयोजन कोणी केले ?
    - (A) नोम चॉम्स्की व वॉल्टर लिपमन
    - (B) बेन बागदिकियन व एडवर्ड बर्नेस
    - (C) वॉल्टर लिपमन व एडवर्ड बर्नेस
    - (D) बॉब वुडवर्ड व नोम चॉम्स्की

16. What is dealing with legislators and government officials to promote or defeat proposed legislation and regulation called ?

(A) Lobbying

(B) Publicity

(C) Media relations

(D) Propaganda

17. Who pioneered the development of the personal influence model of public relations ?

(A) James Grunig

(B) Edward Berneys

(C) Ivy Lee

(D) Krishnamurthy Sriramesh

16. प्रस्तावित कायदे आणि नियम यांचे समर्थन करणे किंवा त्याला विरोध करणे यासाठी विधिमंडळ सदस्य व सरकारी अधिकारी यांच्याशी व्यवहार करणे याला काय म्हणतात ?

(A) लॉबिंग

(B) पब्लिसिटी

(C) मीडिया रिलेशन्स

(D) प्रॉपगांडा

17. जनसंपर्काचे व्यक्तिगत प्रभाव प्रतिमानाच्या (पर्सनल इन्फ्लुएन्स) विकासाला कोणी प्रथम सुरुवात केली ?

(A) जेम्स ग्रुनिग

(B) एडवर्ड बर्नेस

(C) आयव्ही ली

(D) कृष्णमूर्ती श्रीरमेश

18. Which of the following is *not* a correct pairing ?

(*a*) Sevanti Ninan — The hoot

(*b*) Rajiv Melhotra — PSBT

(*c*) Subhash Chandra — Zee

(*d*) Nira Radia — NDTV

Select the correct answer :

(A) All the above

(B) Only (*a*) and (*d*)

(C) Only (*d*)

(D) only (*b*)

19. Which television channel in India reaches maximum people ?

(A) Star Plus

(B) Aaj Tak

(C) Doordarshan

(D) India TV

18. पुढीलपैकी कोणती योग्य जोडी **नाही** ?

(*a*) शेवंती निनन — द हूट

(*b*) राजीव मल्होत्रा — पी. एस्. बी. टी.

(*c*) सुभाषचंद्रा — झी

(*d*) नीरा राडिया — एन. डी. टी. व्ही.

योग्य उत्तर निवडा :

(A) वरीलपैकी सर्व

(B) फक्त (*a*) व (*d*)

(C) फक्त (*d*)

(D) फक्त (*b*)

19. भारतातील कोणती दूरचित्रवाणी वाहिनी सर्वाधिक लोकसंख्येपर्यंत पोचते ?

(A) स्टार प्लस

(B) आज तक

(C) दूरदर्शन

(D) इंडिया टीव्ही

20. Subhash Chandra is chairman of :
    (A) NDTV
    (B) Colors
    (C) Star
    (D) Zee TV

21. Which of the following Communication Scholars is associated with Semiotics ?
    (A) Harold Lasswell
    (B) George Gerbner
    (C) Ferdinand Saussure
    (D) Paul Lazarsfeld

22. Class, status and power were introduced as independent factors of social stratification by :
    (A) Max Weber
    (B) Karl Marx
    (C) Schumacher
    (D) Immanuel Kant

20. सुभाषचंद्रा कोणत्या वाहिनीचे अध्यक्ष आहेत?
    (A) एन्. डी. टी. व्ही
    (B) कलर्स
    (C) स्टार
    (D) झी टीव्ही

21. पुढीलपैकी कोणता संज्ञापन अभ्यासक बोधनशास्त्र (सीमिऑटिक्स) शी संबंधित आहे ?
    (A) हॅरॉल्ड लासवेल
    (B) जॉर्ज गर्बनर
    (C) फर्डिनांड सस्यूर
    (D) पॉल लाझर्सफेल्ड

22. वर्ग, प्रतिष्ठा आणि सत्ता हे सामाजिक स्तरीकरणाचे स्वतंत्र घटक आहेत असे प्रतिपादन कोणी केले ?
    (A) मॅक्स वेबर
    (B) कार्ल मार्क्स
    (C) शूमाकर
    (D) इमॅन्युएल कांट

23. What do wide screen, academy, cinemascope and 70 mm refer to in cinema studies ?

(A) Aspect ratio

(B) Deep focus

(C) Length of the film

(D) Special effects

24. Who directed films like Do Bigha Zameen, Madhumati, Bandini and Humrahi ?

(A) Hrishikesh Mukherji

(B) K. Asif

(C) Bimal Roy

(D) Mehboob Khan

23. चित्रपट अभ्यासात वाइडस्क्रीन, ॲकॅडमी, सिनेमास्कोप आणि 70 mm या संज्ञावरून काय बोध होतो ?

(A) आस्पेक्ट रेशो

(B) डीप फोकस

(C) चित्रपटाची लांबी

(D) स्पेशल इफेक्ट्स

24. दो बिघा जमिन, मधुमती, बंदिनी आणि हमराही या चित्रपटांचे दिग्दर्शक कोण होते ?

(A) हृषिकेश मुकर्जी

(B) के. आसिफ

(C) विमल रॉय

(D) मेहबूब खान

25. During the time of James Hicky who was the Governor General of India ?

(A) Lord Dalhousie

(B) Lord Cornwallis

(C) Lord Ripon

(D) Lord Hastings

26. Media theorist Elizabeth Noelle-Neuman has suggested that people who do not share opinions expressed by the majority of media become reluctant to voice their own views. What is this effect called ?

(A) The spiral of silence

(B) Propaganda

(C) Cultivation

(D) Media dependency

25. जेम्स हिकीच्या काळात भारताचा गवर्नर जनरल कोण होता ?

(A) लॉर्ड डलहौसी

(B) लॉर्ड कॉर्नवॉलिस

(C) लॉर्ड रिपन

(D) लॉर्ड हेस्टिंग्ज

26. माध्यमसैद्धान्तिक एलिझाबेथ नोएल-न्यूमन यांच्या मते ज्या लोकांचे मत बहुतांश माध्यमांतून मांडल्या जाणाऱ्या मतापेक्षा भिन्न असते ते स्वत:चे मत मांडत नाहीत. या परिणामाला काय म्हणतात ?

(A) शांततेचे वलय (स्पिरल ऑफ सायलेन्स)

(B) पद्धतशीर प्रचार (प्रॉपगांडा)

(C) मशागत

(D) माध्यम अवलंबित्व

27. Which of the following is *not* a theoretical school in communication studies ?
    (A) Critical
    (B) Structuralist
    (C) Behaviouristic
    (D) Social

28. "One world, many voices" is the report of which international committee ?
    (A) Wilbur Schramm Committee
    (B) MacBride Committee
    (C) P.C. Joshi Committee
    (D) Johnson Committee

29. The decision on what to include and what to leave out in a shot, is decision related to :
    (A) Framing
    (B) Composition
    (C) Both of the above
    (D) None of the above

27. पुढीलपैकी कोणती संज्ञापनातील सैद्धान्तिक विचारधारा **नाही** ?
    (A) चिकित्सक (क्रिटिकल)
    (B) संरचनाप्रधान (स्ट्रक्चरलिस्ट)
    (C) वर्तनप्रधान (बिहेविअरिस्टिक)
    (D) सामाजिक

28. 'वन वर्ल्ड, मेनी व्हॉइसेस' हा कोणत्या आंतरराष्ट्रीय समितीचा अहवाल आहे ?
    (A) विल्बुर श्रॅम समिती
    (B) मॅक्ब्राइड समिती
    (C) पी.सी. जोशी समिती
    (D) जॉन्सन समिती

29. एखाद्या कॅमेरा शॉटमध्ये कशाचा अंतर्भाव करायचा आणि कशाचा नाही याचा निर्णय कशाशी संबंधित असतो ?
    (A) चौकट लावणे (फ्रेम लावणे)
    (B) शॉटची रचना ठरवणे (कांपोझिशन)
    (C) वरीलपैकी दोन्ही
    (D) वरीलपैकी एकही नाही

30. Which of the following is correct combination of lights for "three point" lighting ?

(A) key light, fill light, back light

(B) fill light, key light, base light

(C) base light, fill light, back light

(D) key light, base light, back light

31. STAR in Star TV stands for :

(A) Satellite Television Asia Region

(B) Satellite Television Australian Region

(C) Satellite Television Asia Russia

(D) Standard Television American Region

30. पुढीलपैकी कोणती प्रकाश योजना 'थ्री पॉइंट' प्रकाशयोजनेसाठी योग्य आहे ?

(A) की लाइट, फिल लाइट, बॅकलाइट

(B) फिल लाईट, की लाइट, बेसलाइट

(C) बेसलाइट, फिल लाइट, बॅकलाइट

(D) की लाइट, बेसलाइट, बॅकलाइट

31. स्टार टीव्ही मधील STAR हे कशाचे लघुरूप आहे ?

(A) सॅटलाइट टेलिव्हिजन एशिया रीजन

(B) सॅटलाइट टेलिव्हिजन ऑस्ट्रेलियन रीजन

(C) सॅटलाइट टेलिविजन आशिया रशिया

(D) सॅटलाइट टेलिविजन अमेरिकन रीजन

32. Process of putting text over visual in television is known as :

(A) super

(B) dissolve

(C) wipe

(D) fade

33. 'Telemarketing' refers to :

(A) Business solicited from consumer over the phone

(B) Business solicited from consumer over TV channels

(C) Business solicited from consumer over online media

(D) Business solicited from consumer over interpersonal communication

32. दूरचित्रवाणीत दृश्यांवर लिखित मजकूर टाकण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात ?

(A) सुपर

(B) डिझॉल्व

(C) वाइप

(D) फेड

33. 'टेलिमार्केटिंग' म्हणजे :

(A) दूरध्वनीद्वारे ग्राहकांकडून व्यापार मिळवणे

(B) दूरचित्रवाणीद्वारे ग्राहकांकडून व्यापार मिळवणे

(C) ऑनलाइन माध्यमांद्वारे ग्राहकांकडून व्यापार मिळवणे

(D) आंतरव्यक्ती संज्ञापनाद्वारे ग्राहकांकडून व्यापार मिळवणे

34. News in capitalist countries has to be 'strained' through several 'filters'. This leads to the financial integration of the media with the rest of the economy, advertising, news management companies, dominant ideology of the society and reliance on official sources of information. This theory of long term media effect is called :

(A) Critical theory

(B) Propaganda theory

(C) Uses and gratifications theory

(D) Bullet theory

35. "Depth of field" varies with :

(A) The distance at which the lens is focused

(B) The focal length of the lens (or the position of zoom)

(C) Aperture

(D) All of the above

34. भांडवलशाही देशात बातम्या अनेक प्रकारच्या 'चाळण्यां' तून 'गाळून' घेतल्या जातात. त्यामुळे माध्यमांचे उर्वरित अर्थव्यवस्था, जाहिरात व्यवसाय, वृत्तव्यवस्थापन व्यवसाय, समाजातील प्रबल विचारधारा आणि माहितीचे अधिकृत स्रोत यांच्याशी आर्थिक एकात्मीकरण घडून येते. माध्यमांच्या दीर्घकालीन परिणामांविषयीच्या या सिद्धान्ताचे नाव काय ?

(A) क्रिटिकल सिद्धांत

(B) प्रॉपगांडा सिद्धांत

(C) युजेस अँड ग्रॅटिफिकेशनस् सिद्धांत

(D) बुलेट सिद्धांत

35. क्षेत्राची खोली (डेफ्थ ऑफ फिल्ड) कशामुळे बदलते ?

(A) भिंग किती लांबवरून फोकस केले जाते त्यानुसार

(B) भिंगाची फोकल लांबी

(C) ॲपर्चर

(D) वरीलपैकी सर्व

36. Any tendency in a news report to deviate from an accurate, neutral, balanced and impartial representation of the 'reality' of events in called :

(A) Prejudice

(B) Attitude

(C) Framing

(D) Bias

37. The major difference between 'web 1.0' and 'web 2.0' lies in :

(A) the way content is created

(B) the way access protocols are used

(C) the way data is stored

(D) the way data is searched

36. बातमीमध्ये घटनांच्या 'सत्यतेचे' अचूक, तटस्थ, संतुलित व नि:पक्षपाती वर्णन न करण्याच्या प्रवृत्तीला काय म्हणतात ?

(A) पूर्वग्रह

(B) वृत्ती

(C) चौकट आखणे

(D) पक्षपातीपणा

37. वेब 1.0 आणि 2.0 यातील मुख्य फरक कशात आहे ?

(A) त्यातील आशय/संदेश निर्माण करण्याच्या पद्धतीत

(B) त्यांच्यापर्यंत पोहचण्याच्या तांत्रिक नियमांमध्ये

(C) त्यातील माहिती साठविण्याच्या पद्धतीत

(D) त्यातील माहितीचा शोध घेण्याच्या पद्धतीत

38. Systematic and one-sided use of multiple means of communication to deliberately influence collective behaviour and opinion is called as :

(A) Agenda setting

(B) Publicity

(C) Public relations

(D) Propaganda

39. On the generic criteria find the odd out from the following set :

Saas Bhi Kabhi Bahu Thi, Pavitra Rishta, Tarak Mehta Ka Ulta Chashma, Balika Vadhu

(A) Balika Vadhu

(B) Tarak Mehta Ka Ulta Chashma

(C) Pavitra Rishta

(D) Saas Bhi Kabhi Bahu Thi

38. सामूहिक वर्तन आणि मते यांवर जाणीवपूर्वक प्रभाव टाकण्यासाठी संज्ञापनाच्या विविध मार्गांचा पद्धतशीर आणि एकतर्फी वापर करण्याच्या प्रक्रियेला काय म्हणतात ?

(A) विषय निश्चिती (अजेंडा सेटिंग)

(B) प्रसिद्धी (पब्लिसिटी)

(C) जनसंपर्क (पब्लिक रिलेशन्स)

(D) प्रचार (प्रॉपगांडा)

39. रचनाबंधाच्या निकषावर खालील संचामध्ये न बसणारा कार्यक्रम ओळखा :

सास भी कभी बहू थी, पवित्र रिश्ता, तारक मेहता का उल्टा चश्मा, बालिका वधू

(A) बालिका वधू

(B) तारक मेहता का उल्टा चश्मा

(C) पवित्र रिश्ता

(D) सास भी कभी बहू थी

40. He turned the common man into uncommon success, with films like Awara, Andaaz, Jis Desh Mein Ganga Bahati Hai :

(A) Manoj Kumar

(B) Subhash Ghai

(C) Amir Khan

(D) Raj Kapoor

41. Which of the following terms would apply when media publications systematically give negative views about some social groups ?

(A) Bias

(B) Sensationalism

(C) Nuisance value

(D) Prejudice

40. या दिग्दर्शकाने आवारा, अंदाज, जिस देश में गंगा बहती है, यासारख्या चित्रपटातून सामान्य माणसाला असामान्य यशात रूपांतरित केले :

(A) मनोज कुमार

(B) सुभाष घई

(C) आमीर खान

(D) राज कपूर

41. जेव्हा माध्यमप्रकाशने काही सामाजिक गटांविषयी पद्धतशीरपणे नकारात्मक दृष्टीकोन सादर करतात, त्याचे वर्णन पुढीलपैकी कोणत्या शब्दाने अधिक अचूक होऊ शकते ?

(A) पक्षपातीपणा

(B) सनसनाटीपणा

(C) उपद्रवमूल्य

(D) पूर्वग्रह

42. The techniques of printing and the use of movable type were known and applied in two countries long before Gutenberg. One of the two countries was China. Which one was the other ?

(A) India

(B) England

(C) Korea

(D) Japan

43. A person can be called an accused in a criminal case only after :

(A) The person is convicted by the court

(B) The charge-sheet is filed

(C) The First Information Report is filed

(D) A complaint is lodged with the police

42. गटेनबर्गने छपाईसाठी हालत्या खिळ्यांचा शोध लावण्यापूर्वी छपाई आणि हालते खिळे यांचा वापर दोन देशांमध्ये होत होता. त्यांपैकी एक देश चीन होता. दुसरा देश कोणता होता ?

(A) भारत

(B) इग्लंड

(C) कोरिया

(D) जपान

43. एखाद्या गुन्हेगारी प्रकरणात एखाद्या व्यक्तीला 'आरोपी' असे कधी संबोधता येऊ शकते ?

(A) न्यायालयाने त्याला दोष ठरवल्यावर

(B) आरोपपत्र दाखल झाल्यावर

(C) प्राथमिक माहिती अहवाल सादर झाल्यावर

(D) पोलिसांकडे तक्रार नोंदवल्यावर

44. Which of the following is often associated with Yellow Journalism ?

(A) Magazine Journalism

(B) Film Journalism

(C) Business Journalism

(D) Tabloid Journalism

45. Who is the owner of 'Newscorp' ?

(A) Ted Turner

(B) Bernard Berlusconi

(C) Rupert Murdoch

(D) Pronoy Roy

46. If the name of a minor involved in a criminal act is revealed by the news media that act is :

(A) Illegal and unethical

(B) Only unethical

(C) Legal

(D) Unprofessional

44. पुढीलपैकी कशाचा बऱ्याचदा पीतपत्रकारितेशी संबंध जोडला जातो ?

(A) नियतकालिक पत्रकारिता

(B) चित्रपट पत्रकारिता

(C) अर्थविषयक पत्रकारिता

(D) टॅब्लॉइड जर्नलिझम

45. 'न्यूजकॉर्प'चे मालक कोण ?

(A) टेड टर्नर

(B) बर्नर्ड बर्लुस्कोनी

(C) रूपर्ट मॅर्डाक

(D) प्रणय रॉय

46. एखाद्या गुन्हेगारी कृत्यात सहभागी असलेल्या अल्पवयीन व्यक्तीचे नाव वृत्तमाध्यमांद्वारे प्रसिद्ध करणे कसे मानले जाते ?

(A) बेकायदेशीर व अनैतिक

(B) अनैतिक

(C) कायदेशीर

(D) अव्यावसायिक

47. Which committee recommended the setting up of a National Broadcast Trust ?

(A) The Chedda Committee

(B) The Verghese Committee

(C) The Chanda Committee

(D) P.C. Joshi Committee

47. कोणत्या समितीने राष्ट्रीय प्रसारण न्यासाच्या (नॅशनल ब्रॉडकास्ट ट्रस्ट) स्थापनेची शिफारस केली ?

(A) छेड्डा समिती

(B) वर्गिझ समिती

(C) चंदा समिती

(D) पी.सी. जोशी समिती

48. Media operates in a dual market. They sell ...........(i)......... to consumers and .............(ii).......... advertisers.

(A) (i) product (ii) service

(B) (i) service (ii) product

(C) (i) facts (ii) fiction

(D) (i) content (ii) advertising

48. माध्यमे दोन बाजारपेठांमध्ये व्यवहार करत असतात. ते ग्राहकानां ...........(i)....... विकतात आणि जाहिरातदारांना ...........(ii)....... विकतात.

(A) (i) उत्पाद (ii) सेवा

(B) (i) सेवा (ii) उत्पाद

(C) (i) वास्तव घटना (ii) कल्पित घटना

(D) (i) आशय (ii) जाहिराती

49. 'Actualities' in early cinema referred to :
    (A) capturing simple events such as trains arriving/leaving, public events and simple activities
    (B) Documentaries
    (C) Private lives of celebrities
    (D) Capturing under privileged classes

49. चित्रपटांच्या प्रारंभीच्या काळात 'ॲक्चुॲलिटीज' चा अर्थ काय होता ?
    (A) आगगाडीचे आगमन/प्रस्थान, सार्वजनिक घटना, साध्या साध्या गोष्टी यांचे चित्रण करणे
    (B) माहितीपट
    (C) प्रसिद्ध व्यक्तींचे खाजगी आयुष्य
    (D) वंचित घटकांचे चित्रण

50. The Newspaper 'Dina Thanthi' is published in the language :
    (A) Tamil
    (B) Kannada
    (C) Malayalam
    (D) Oriya

50. 'दिनतंती' हे वर्तमानपत्र कोणत्या भाषेतून प्रकाशित होते ?
    (A) तमिळ
    (B) कन्नड
    (C) मलयालम
    (D) ओरिया

51. If a newspaper publishes the photograph of a suspect in a criminal case such an act is :

(A) defamatory and unethical

(B) only unethical

(C) defamatory

(D) only unprofessional

51. वर्तमानपत्राने एखाद्या गुन्ह्यातील संशयिताचे छायाचित्र छापले तर ते कृत्य कसे मानले जाते ?

(A) अब्रूनुकसानी करणारे व अनैतिक

(B) फक्त अनैतिक

(C) फक्त अब्रूनुकसानी करणारे

(D) फक्त अव्यावसायिक

52. Among the five ethical guidelines is the Golden Mean. This mean was proposed by :

(A) Immanuel Kant

(B) Socrates

(C) Aristotle

(D) John Stuart Mill

52. पाच प्रमुख नीतिशास्त्रीय मार्गदर्शक तत्त्वांमध्ये 'सुवर्ण मध्य' या तत्त्वाचा समावेश होतो. ते तत्त्व कोणी मांडले ?

(A) इमॅन्युएल काण्ट

(B) सॉक्रेटिस

(C) ॲरिस्टॉटल

(D) जॉन स्टुअर्ट मिल

53. Communication is a symbolic process whereby reality is produced, maintained, repaired and transformed. This cultural definition of communication was first proposed by :

(A) Emile Durkheim

(B) James Carey

(C) Stuart Hall

(D) Max Weber

54. Which Bill banned cross-media ownership and foreign ownership ?

(A) Prasar Bharati Act (1990)

(B) The Broadcasting Bill (1997)

(C) The Akashwani Bill (1952)

(D) None of the above

53. संज्ञापन ही एक प्रतिकात्मक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत वास्तवाची निर्मिती होते, त्याला स्थिरता दिली जाते, त्यात दुरुस्ती केली जाते आणि बदलही घडवला जातो. संज्ञापनाची ही सांस्कृतिक व्याख्या प्रथम कोणी मांडली ?

(A) एमिल डुर्खाइम

(B) जेम्स कॅरी

(C) स्टुअर्ट हॉल

(D) मॅक्स वेबर

54. कोणत्या विधेयकामुळे परस्पर-माध्यम मालकी (क्रॉस मीडिया ओनरशिप) आणि परकीय मालकी यांवर बंदी आली ?

(A) प्रसारभारती कायदा (1990)

(B) प्रसारण विधेयक (ब्रॉडकास्टिंग बिल) (1997)

(C) आकाशवाणी विधेयक (1952)

(D) वरीलपैकी कोणतेही नाही

55. Which of the following Acts empowers the state to forfeit copies of a publication that offends Indian Penal Code provisions relating to public order or security of the state ?

(A) Contempt of Court Act, 1971

(B) The Copyright Act, 1957

(C) The Criminal Procedure Code, 1973

(D) The Official Secrets Act, 1923

56. Which of the following is *not* a correct pairing of family and newspaper ?

(A) Jain Family — The Times of India

(B) Goenka Family — The Indian Express

(C) Pawar Family — Saakal

(D) Mammen Family — Eenadu

55. पुढीलपैकी कोणत्या कायद्यानुसार सुव्यवस्था आणि देशाची सुरक्षितता यांच्यासंबंधी दंड संहितेत असलेल्या तरतुदींचा भंग करणाऱ्या प्रकाशनाच्या प्रती जप्त करण्याचा शासनाला अधिकार आहे ?

(A) न्यायालयाचा अवमान, 1971

(B) स्वामित्व हक्क कायदा, 1957

(C) फौजदारी दंडसंहिता, 1973

(D) सरकारी गोपनीयता कायदा, 1923

56. परिवार आणि त्यांच्या मालकीचे वृत्तपत्र यांच्यापैकी पुढीलपैकी कोणती जोडी **अयोग्य** आहे ?

(A) जैन परिवार — टाइम्स ऑफ इंडिया

(B) गोएंका परिवार — इंडियन एक्सप्रेस

(C) पवार परिवार — सकाळ

(D) ममेन परिवार — ईनाडू

57. Which of the following Committees was set up to give recommendations for production of 'software' on Doordarshan' ?

(A) Chanda Committee

(B) Joshi Committee

(C) Verghese Committee

(D) Vardhan Committee

58. Julian Assange is primarily known for his association with which of the following ?

(A) Wikipedia

(B) Wikileaks

(C) Wikimedia

(D) Wikisecrets

57. पुढीलपैकी कोणत्या समितीची स्थापना दूरर्शनच्या कार्यक्रमनिर्मितीविषयी शिफारसी करण्यासाठी झाली होती ?

(A) चंदा समिती

(B) जोशी समिती

(C) वर्गिझ समिती

(D) वर्धन समिती

58. पुढीलपैकी कशाशी ज्युलियन असाँज संबंधित आहे ?

(A) विकिपिडिया

(B) विकिलीक्स

(C) विकिमीडिया

(D) विकिसिक्रेट्स

59. Which two issues does the film 'Peepli Live' portray ?

(A) Farmers' suicides and live TV coverage

(B) Farmers' suicides and remedies

(C) Corruption and live TV coverage

(D) Celebrities and live TV coverage

60. Which of the following has the authority to auction licenses for private FM radio stations in India ?

(A) Ministry of Broadcasting

(B) Ministry of I & B

(C) Ministry of Telecommunication

(D) Ministry of Information

59. 'पीपली लाइव्ह' या चित्रपटात कोणत्या दोन प्रश्नांचे चित्रण केले आहे ?

(A) शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि थेट प्रसारण

(B) शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि उपाय

(C) भ्रष्टाचार आणि थेट प्रसारण

(D) प्रख्यात व्यक्ती आणि थेट प्रसारण

60. पुढीलपैकी कोणत्या खात्याकडे खाजगी एफ्. एम्. रेडियो केंद्राच्या परवान्यांचा लिलाव करण्याचा अधिकार आहे ?

(A) प्रसारण खाते

(B) माहिती व प्रसारण खाते

(C) दूरसंचार खाते

(D) माहिती खाते

61. What is common to 'City', 'One', 'Red', 'Indigo' ?

(A) They are English words

(B) They are names of private FM radio stations

(C) They are names of newspapers

(D) There is nothing common in them

62. Arrange the following films in chronological order :

(*i*) Alam Ara

(*ii*) Acchoot Kanya

(*iii*) Araadhana

(*iv*) Amar, Akbar, Anthony

Select the correct answer :

(A) (*i*), (*ii*), (*iii*), (*iv*)

(B) (*ii*), (*i*), (*iii*), (*iv*)

(C) (*iv*), (*i*), (*ii*), (*iii*)

(D) (*i*), (*iii*), (*ii*), (*iv*)

61. 'सिटी', 'वन', 'रेड' आणि 'इंडिगो' यांत समानता काय आहे ?

(A) ते सर्व इंग्रजी शब्द आहेत

(B) ती सर्व खाजगी व्यापारी एफ्.एम्. रेडियो केंद्राची नावे आहेत

(C) ती वर्तमानपत्रांची नावे आहेत

(D) त्यांच्यात काहीही समानता नाही

62. पुढील चित्रपट त्यांच्या निर्मिती क्रमानुसार सांगा :

(*i*) आलमआरा

(*ii*) अछूत कन्या

(*iii*) आराधना

(*iv*) अमर, अकबर, अँथनी

योग्य उत्तर निवडा :

(A) (*i*), (*ii*), (*iii*), (*iv*)

(B) (*ii*), (*i*), (*iii*), (*iv*)

(C) (*iv*), (*i*), (*ii*), (*iii*)

(D) (*i*), (*iii*), (*ii*), (*iv*)

63. Match pairs and select the correct answer from the codes given below :

| | | | |
|---|---|---|---|
| (*p*) | Ankur | (*i*) | Mahesh Bhatt |
| (*q*) | Ardhasatya | (*ii*) | Satyajit Ray |
| (*r*) | Aparajito | (*iii*) | Govind Nihalani |
| (*s*) | Arth | (*iv*) | Shyam Benegal |

*Codes* :

(A) (*p*)–(*i*), (q)–(*ii*), (*r*)–(*iii*), (*s*)–(*iv*)

(B) (*p*)–(*iv*), (q)–(*iii*), (*r*)–(*ii*), (*s*)–(*i*)

(C) (*p*)–(*ii*), (q)–(*i*), (*r*)–(*iv*), (*s*)–(*iii*)

(D) (*p*)–(*iii*), (q)–(*iv*), (*r*)–(*ii*), (*s*)–(*i*)

64. Why are broadcasts of Al-Jazeera considered important by communication scientists and scholars of international affairs ?

(A) They offer a non-western view of world events

(B) They are more pro-Asia

(C) They have a post-modernistic editorial view

(D) Because of 9/11

63. जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतांकातून योग्य उत्तर निवडा :

| | | | |
|---|---|---|---|
| (*p*) | अंकुर | (*i*) | महेश भट्ट |
| (*q*) | अर्धसत्य | (*ii*) | सत्यजित राय |
| (*r*) | अपराजितो | (*iii*) | गोविंद निहलानी |
| (*s*) | अर्थ | (*iv*) | श्याम बेनेगल |

**संकेतांक :**

(A) (*p*)–(*i*), (q)–(*ii*), (*r*)–(*iii*), (*s*)–(*iv*)

(B) (*p*)–(*iv*), (q)–(*iii*), (*r*)–(*ii*), (*s*)–(*i*)

(C) (*p*)–(*ii*), (q)–(*i*), (*r*)–(*iv*), (*s*)–(*iii*)

(D) (*p*)–(*iii*), (q)–(*iv*), (*r*)–(*ii*), (*s*)–(*i*)

64. अल्-जझीरा वाहिनीचे कार्यक्रम संज्ञापन शास्त्रज्ञ व आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या अभ्यासकांना महत्त्वाचे का वाटतात ?

(A) त्यातून जागतिक घडामोडींकडे पाहण्याचा पाश्चिमात्येतर (नॉन-वेस्टर्न) दृष्टीकोन मांडला जातो

(B) ते अधिक आशियाधार्जिणे असतात

(C) त्यांचा संपादकीय दृष्टीकोन उत्तर-आधुनिक आहे

(D) 9/11 मुळे

65. Name the journalist and the ethical crime by him due to which 'Time' and 'CNN' had temporarily suspended his service :

(A) Zakaria, Plagiarism

(B) Amanpour, breach of privacy

(C) Zakaria, contempt of court

(D) Dutt, insider trading

66. Which of the following pairs is associated with India's first indigenous Soap Opera 'Hum Log'?

(A) Shobha Doctor and P. Kumar Vasudev

(B) P. Kumar Vasudev and Prasanna Joshi

(C) Ketaki Garg and Manohar Joshi

(D) Manohar Joshi and Krithika Desai

65. ज्या पत्रकाराच्या नैतिक अपराधामुळे 'टाइम' आणि 'सी.एन्.एन्.' ने त्याची सेवा तात्पुरती थांबवली होती, त्याचे नाव व त्याच्या कृत्याचे स्वरूप काय होते ?

(A) झकेरिया, वाङ्मयचौर्य

(B) अमनपोर, खाजगीपणाचा भंग

(C) झकेरिया, न्यायालयाचा अवमान

(D) दत्त, अनैतिक आर्थिक उलाढाल (इनसायडर ट्रेनिंग)

66. 'हमलोग' या भारतीय दूरचित्रवाणी मालिकेशी पुढीलपैकी कोणती जोडी संबंधित होती ?

(A) शोभा डॉक्टर आणि पी. कुमार वासुदेव

(B) पी. कुमार वासुदेव आणि प्रसन्न जोशी

(C) केतकी गर्ग आणि मनोहर जोशी

(D) मनोहर जोशी आणि कृतिका देसाई

67. The first person to define the mass formally as a new type of social formation in modern society in contrast with the group, crowd and public was :

(A) Herbert Blumer

(B) Marshall McLuhan

(C) Noam Chomsky

(D) Raymond Williams

68. Who was the first woman to act in Indian cinema ?

(A) Devika Rani

(B) Kamalabai Gokhale

(C) Jubeida

(D) Gohar

67. आधुनिक समाजात गट, गर्दी, समाज यांपेक्षा भिन्न असलेल्या 'जन' (मास) या सामाजिक रचनेची व्याख्या प्रथम कोणी केली ?

(A) हर्बर्ट ब्लुमर

(B) मार्शल मॅक्लुहान

(C) नोम चॉम्स्की

(D) रेमंड विल्यम्स

68. भारतीय चित्रपटात अभिनय करणारी पहिली स्त्री कोण होती ?

(A) देविका राणी

(B) कमलाबाई गोखले

(C) झुबेदा

(D) गोहर

69. According to John Fiske the meaningful outcome of the encounter between content and the reader is called :

(A) Discourse

(B) Text

(C) Context

(D) Message

70. The Marathi person who set up the first Hindi newspaper 'Aaj' in Varanasi was :

(A) Baburao Paradkar

(B) Madhav Sapre

(C) Balshastri Jambhekar

(D) Achyut Patwardhan

69. जॉन फिस्के यांच्या मते आशय आणि वाचक यांच्यातील आंतरक्रियेच्या अर्थपूर्ण निष्पत्तीला काय म्हणतात ?

(A) संभाषित (डिसकोर्स)

(B) संहिता (टेक्स्ट)

(C) आशय (कंटेंट

(D) संदेश (मेसेज)

70. वाराणसीमधून 'आज' नावाचे हिंदीतील पहिले वृत्तपत्र प्रसिद्ध करणारे मराठी व्यक्ती कोण ?

(A) बाबुराव पराडकर

(B) माधव सप्रे

(C) बाळशास्त्री जांभेकर

(D) अच्युत पटवर्धन

71. The law which fell for consideration in the Sakal Papers (P) Ltd. *versus* Union of India was :

(A) Newspaper (Price and Page) Act, 1956

(B) Working Journalists and Other Newspaper Employees (Conditions of Service) and Miscellaneous Provisions Act, 1955

(C) General Causes Act 1897

(D) Essential Commodities Act 1955

71. सकाळ पेपर्स प्रा. लि. **विरुद्ध** भारत सरकार या खटल्याचा संबंध खालीलपैकी कोणत्या कायद्याशी होता ?

(A) वृत्तपत्र (किंमत आणि पृष्ठसंख्या) कायदा 1956

(B) श्रमिक पत्रकार आणि इतर वृत्तपत्र कर्मचारी (सेवाशर्ती) आणि इतर तरतुदी कायदा 1955

(C) मुद्रणाधिकार कायदा 1897

(D) अत्यावश्यक वस्तूंचा कायदा 1955

72 Which of the following is *not* a valid 'Rasa' created in communication according to Indian aesthetics ?

(A) Romance

(B) Disgust

(C) Hatred

(D) Laughter

72. भारतीय सौंदर्यशास्त्रानुसार संज्ञापनामुळे निर्माण होणाऱ्या रसांमध्ये खालीलपैकी कोणत्या रसाचा समावेश करण्यात येत **नाही** ?

(A) शृंगार

(B) बीभत्स

(C) विद्वेष

(D) हास्य

Refer to the paragraph for Q. No. **73** to Q. No. **75** :

Some decades ago, India was a world leader in experimenting with television technology for spurring national and local development. However, as was the case with AIR and radio farm forums, India failed to capitalize on the lessons learned from these early television experiments, frittering away a golden opportunity. The cases of SITE and the Kheda Communication Project are illustrative.

(*Singhal and Rogers* : P. 93)

73. The cases of SITE and KCP illustrates examples of use of television for :

(A) Development

(B) Entertainment

(C) Information

(D) Political Movement

खालील परिच्छेद वाचून त्यानंतरच्या तीन प्रश्नांची (प्र. क्र. **73** ते **75**) उत्तरे द्या :

दूरचित्रवाणी तंत्रज्ञानाचा वापर करून स्थानिक आणि राष्ट्रीय विकासाला प्रोत्साहन देणारे प्रयोग करण्यामध्ये काही दशकांपूर्वी भारत जगात आघाडीवर होता. मात्र आकाशवाणी आणि नभोवाणी शेती मंडळांचे पुढे जसे झाले तसे दूरचित्रवाणीच्या ही बाबतीत झाले आणि पूर्वीच्या प्रयोगांमधून मिळालेल्या अनुभवांचा फायदा आपल्याला घेता आला नाही. त्यामुळे एक सुवर्ण-संधी आपण गमाविली 'साईट' प्राणि 'खेडा' प्रकल्प ही त्यासंदर्भात बोलकी उदाहरणे आहेत

(**सिंघल आणि रॉजर्स** : P. 93)

73. साईट आणि खेडा प्रकल्पांमध्ये दूरचित्रवाणीचा वापर कशाकरिता केला गेला होता ?

(A) विकासाकरिता

(B) मनोरंजनाकरिता

(C) माहितीकरिता

(D) राजकीय चळवळीकरिता

74. Radio farm forums illustrates example of :

(A) narrowcasting and agriculture

(B) broadcasting and society

(C) education and politics

(D) entertainment and education

75. History of television in India is indicative of :

(A) Failed state intervention

(B) Political role of state

(C) Technology driving society

(D) Lost opportunities by industry

74. नभोवाणी शेती मंडळ हे कशाचे उदाहरण आहे ?

(A) लघुक्षेपण आणि शेती

(B) प्रसारण आणि समाज

(C) शिक्षण आणि राजकारण

(D) मनोरंजन आणि शिक्षण

75. भारतातील दूरचित्रवाणीच्या इतिहासातून कोणती बाब स्पष्ट होते ?

(A) शासकीय हस्तक्षेपास आलेले अपयश

(B) सरकारची राजकीय भूमिका

(C) समाजाला हाकणारे तंत्रज्ञान

(D) उद्योगाने गमाविलेली संधी

**ROUGH WORK**

## ROUGH WORK